# मंगलाताई भागवत फाऊंडेशन

**वेळ : २ तास** **विषय : इतिहास–राज्यशास्त्र–कृतिपत्रिका** **गुण : ४०**

---

**सूचना :**

१. सर्व कृती/प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

२. उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे गुण दर्शवतात.

३. प्रश्न/कृती १ ते ५ इतिहासावर तर प्रश्न/कृती ६ ते ९ राज्यशास्त्रावर विचारलेल्या आहेत.

४. प्रश्न क्रमांक १(अ) व प्रश्न क्रमांक ६ मध्ये संपूर्ण विधाने लिहिणे आवश्यक आहे.

५. प्रश्न क्रमांक २(अ) आणि ८ (ब) मध्ये दिलेली संकल्पना चित्रे कृति पत्रिकेनुसारच पेनाने उत्तर पत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

६. प्रश्न क्रमांक १(ब) मधील प्रत्येक संचातील फक्त चुकीची जोडी ओळखून लिहिणे अपेक्षित आहे.

७. प्रश्न क्रमांक १(अ), १ (ब) व ६ या प्रश्नांची उत्तरे एकापेक्षा अधिक वेळा लिहिलेली असल्यास, प्रथम लिहिलेली उत्तरेच गुणांसाठी गृहीत धरली जातील.

---

**प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.** **(३)**

(१) भारतातील.......... या शहरात 'सृष्टी इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी' या संस्थेत 'जनांसाठी इतिहास' या विषयातील संशोधनाचे काम चालते.

(अ) मुंबई (ब) बैंगलुरु (क) चेन्नई (ड) कोलकाता

(२) चालुक्य राजा सोमेश्वर याने '...........' या ग्रंथात चित्रकथी परंपरेचे वर्णन केले आहे.

(अ)नाट्यशास्त्र (ब) किताब–ए–नवरस (क) अजिंठ्याची चित्रकला

(ड) अभिलषितार्था चिंतामणी

(३) 'प्रभाकर' या वर्तमानपत्रातून ........... यांची समाज प्रबोधन पर 'शतपत्रे' प्रसिद्ध झाली.

(अ) भाऊ महाजन (ब) बाळशास्त्री जांभेकर (क) लोकहितवादी (ड) कृष्णराव भालेकर

**(ब) पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून लिहा.** **(३)**

| | **(१) इतिहास लेखन** | | **लेखक** |
|---|---|---|---|
| i) | राष्ट्रवादी इतिहास लेखन | – | स्वा.वि.दा.सावरकर |
| ii) | मानर्सवादी इतिहास लेखन | – | दामोदर धर्मानंद कोसंबी |
| iii) | वंचितांचा इतिहास | – | रामचंद्र गुहा |
| iv) | स्त्रीवादी इतिहास | – | शर्मिला रेगे |

(२) वास्तू — शैली

i) छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनस – गॉथिक स्थापत्य

ii) गोल घुमट – मुस्लीम स्थापत्य

iii) दक्षिणेकडील मंदिरे – नागर स्थापत्य

iv) गोंदेश्वर मंदिर – हेमांडपंती स्थापत्य

(३) विचारवंताचे नाव — ग्रंथाचे नाव


i) जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल – रिझन इन हिस्टरी

ii) लिओपॉल्ड व्हॉन रांके – द थिअरी ॲण्ड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी


iii) हिरोडोटस – द हिस्टरीज

iv) कार्ल मार्क्स – डिसकोर्स ऑन द मेथड


**प्रश्न २ (अ) पुढील संकल्पना चित्रे पूर्ण करा. (फक्त २)** **(४)**




(२) 'भजन' या प्रकाराला लोकप्रिय करणारे संत.




(३) प्राचीन ऑलिम्पिक स्पर्धांनी हे सामने सुरु केले



**(ब) थोडक्यात टिपा लिहा. (फक्त २)** **(४)**

१) प्राच्यवादी इतिहास लेखन

२) मंदिर स्थापत्यशैली

३) मराठी विश्वकोश

**प्रश्न ३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (फक्त २)** **(४)**

१) गोविंद सखाराम सरदेसाई यांना लोक 'रियासतकार' म्हणूनच ओळखू लागले.

२) इतिहासाची संशोधक पद्धती अनेक विषयांच्या संशोधनात उपयुक्त ठरते.


३) दि. ६ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रात 'पत्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो.

४) चित्रपट माध्यमात इतिहास हा विषय महत्वाचा आहे.

**प्रश्न ४. पुढील परिच्छेद काळजीपूर्वक वाचून त्या खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (फक्त २)** **(४)**

महाबळेश्वर येथून जवळच असलेले भिलार हे निसर्गरम्य आणि स्ट्रॉबेरीचा गोडवा असलेले गाव. पुस्तकांच्या या गावामध्ये अनेक घरात पर्यटकांसाठीच पुस्तके आहेत. वाचन चळवळ वाढावी. मराठी भाषेतील नवे-जुने लखक, संत साहित्य, कथा-कादंबरी, कविता, ललित, चरित्रे-आत्म चरित्रे स्त्री साहित्य, क्रीडा, बाल साहित्य यांच्या फुललेल्या बहारदार विश्वास तुम्ही 'वाचन-आनंद' घ्यावा. यासाठी महाराष्ट्र शासनाने हा प्रकल्प राबवला आहे.

**१. पुढील संकल्पनचित्र पूर्ण करा.** **(१)**




२) पुस्तकांच्या या गावात कोणकोणत्या प्रकारची पुस्तके आहेत ? **(१)**

३) भिलार गावाला 'पुस्तकांचे गाव' असे का म्हटले आहे ? **(२)**

**प्रश्न ५. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (फक्त २)** **(६)**

१) कार्ल मार्क्स यांचा वर्ग सिद्धांत स्पष्ट करा.

२) वृत्तपत्रांच्या इतिहासातील 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांचे महत्व स्पष्ट करा.

३) भारताच्या 'राष्ट्रीय अभिलेखागारा'ची माहिती लिहा.

४) 'मैदानी खेळ' आणि 'बैठे खेळ' यांच्यातील फरक स्पष्ट करा.

**प्रश्न ६. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा. (२)**

१) ७३व्या व ७४व्या संविधान दुरुस्त्यांमुळे ........ संविधानाची मान्यता मिळून त्यांच्या अधिकारात वाढ झाली आहे.

अ) संसदेला ब) स्थानिक शासन संस्थांना क) विधि मंडळांना ड) सहकारी संस्थांना

२) ............ यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला दूर करण्यासाठी नक्षलवाद सुरु झाला.

अ) कामगार व दलित ब) मध्यम व खालचा वर्ग

क) गरीब व सामान्य वर्ग ड) भूमिहीन शेतकरी व आदिवासी

**प्रश्न ७. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (कोणतेही २) (४)**

१) भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते.

२) आघाडी शासनातून अस्थिरता निर्माण होते.


३) डॉ. राजेंद्र सिंह यांना 'भारताचे जलपुरुष' या नावाने ओळखले जाते.

**प्रश्न ८.अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. (फक्त एक) (२)**


१) मध्यवर्ती निवडणुका.

२) राजकारणाचे गुन्हेगारीकरिता

**ब) पुढील संकलप्ना चित्रे पूर्ण करा. (फक्त एक) (२)**




२) स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासींचे झालेले उठाव.




**प्रश्न ९. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (फक्त एक) (२)**

१) ईव्हीएम मशीनच्या वापराचे कोणते फायदे झाले ?

२) भारतातील पक्ष पद्धतीच्या स्वरुपात कोणते बदल झाले आहेत ?

**********